**प्रेस नोट** दि.१२/०६/२०२४

## मोटारसायकल चोरी करणारा गुन्हेगार आदित्य ऊर्फ पोत्या बसवराज दोडमणी हा एमपीडीए कायद्यान्वये स्थानबध्द.

सोलापूर शहरातील सदर बझार पोलीस ठाणे हद्दीतील सराईत गुन्हेगार, **आदित्य ऊर्फ पोत्या बसवराज दोडमणी, वय २७ वर्षे, रा. विजापूर रोड, नडगेरी पेट्रोलपंप जवळ, सोलापूर** हा मागील काही वर्षापासुन सातत्याने घातक शस्त्राचा वापर करुन मोटार सायकल चोरी, घरफोडी, घातक शस्त्राने ईच्छापुर्वक दुखापत करणे, गैरकायद्याची मंडळी जमविणे, दगडफेक करणे या सारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे साथीदारांच्या मदतीने, अवैध आर्थिक फायदा मिळवण्यासाठी करीत आला आहे. त्याच्या विरुध्द अश्या प्रकारे गंभीर स्वरुपाचे एकुण ११ गुन्हे सोलापुर शहरात दाखल आहेत. त्याचे या गुन्हेगारी कृत्यामुळे सोलापुर शहरातील नागरीकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होऊन, सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झाली आहे. आदित्य ऊर्फ पोत्या बसवराज दोडमणी याच्या गुन्हेगारी कृत्यामुळे, त्याची सोलापुर शहरातील व्यापारी व सामान्य नागरीकांमध्ये दहशत असुन, त्याचे विरुध्द सामान्य नागरीक उघडपणे पोलीसांना माहीती देत नाहीत.

**आदित्य ऊर्फ पोत्या बसवराज दोडमणी यास त्याच्या गुन्हेगारी कारवायापासून परावृत्त करण्यासाठी सन २०२३ मध्ये क.११०(ई)(ग) फौ.प्र.सं. अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. त्यानंतरही आदित्य ऊर्फ पोत्या बसवराज दोडमणी याच्या वर्तनात कोणताच बदल झाला नाही आणि त्याने सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा होईल अशी वरीलप्रमाणे गुन्हेगारी कृत्य चालु ठेवली.** त्यामुळे त्याचे गुन्हेगारी कृत्यास वेळीच प्रतिबंध करण्यासाठी, मा.एम. राज कुमार, पोलीस आयुक्त सोलापुर शहर यांनी, दि.१०/०६/२०२४ रोजी त्याचे विरुध्द एमपीडीए अधिनियम, १९८१ चे कलम ३ अन्वये स्थानबध्दतेचे आदेश निर्गमित करुन, दि.१२/०६/२०२४ रोजी स्थानबध्द आदेशाची बजावणी करुन, येरवडा कारागृह, पुणे येथे दाखल करण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही, मा. एम. राज कुमार, मा.पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली, मा.डॉ.दीपाली काळे पोलीस उप-आयुक्त (गुन्हे/विशा), मा. विजय कबाडे पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), प्रांजली सोनवणे, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे, अजय परमार, सहाय्यक पोलीस आयुक्त विभाग-०२, सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुन्हे, अजित लकडे, वपोनि, सदर बझार पोलीस ठाणे, भालचंद्र ढवळे, पोनि, सदर बझार पोलीस ठाणे, पोउपनि/विशेंद्रसिंग बायस गुन्हे शाखा, एमपीडीए पथकातील अंमलदार पोहेकॉ-/८३३ विनायक संगमवार, पोहेकॉ/१२५४ सुदीप शिंदे, पोशि/१९१६ अक्षय जाधव, पोशि/६५४ विशाल नवले यांनी केली आहे

---

**पोलीस आयुक्त, सोलापूर शहर**
**यांचे करिता**

सोलापूरातील **प्रसिध्द दैनिक** वृत्तपत्र/इलेट्रीक **मिडीया संपादक**
**वरीलप्रमाणे बातमीपत्र आपले लोकप्रिय दैनिकामध्ये जनहितार्थ प्रसिध्द करणेस विनंती आहे.**


R.A.N